# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.11.2025** **वार:गुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज स्कायरूटच्या इन्फिनिटी कॅम्पसचं दूरस्थ माध्यमातून उद्घाटन करणार
2. युनेस्को मुख्यालयात संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचं अनावरण
3. पुण्यातल्या खडकवासला ते खराडी आणि नळ स्टॉप ते माणिक बाग या नव्या मेट्रो मार्गांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
4. महाराष्ट्र सरकारकडून शेतीशी निगडीत कर्जवसुलीला एक वर्षाची स्थगिती, शेती कर्जाचं होणार पुनर्गठन आणि
5. 100 वी राष्ट्रकुल स्पर्धा 2030मध्ये अहमदाबादमध्ये होणार

**<u>पंतप्रधान स्कायरूट</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता स्कायरूट या भारतीय अंतराळ स्टार्टअपच्या इन्फिनिटी कॅम्पसचं दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करणार आहेत. स्कायरूटच्या पहिल्या ऑर्बिटल रॉकेट, विक्रम-वनचे अनावरणही ते करतील, उपग्रह कक्षेत प्रक्षेपित करण्याची क्षमता या रॉकेटमध्ये आहे. स्कायरूटच्या या जवळपास 2 लाख चौरसफुट क्षेत्रावरील अत्याधुनिक इन्फिनिटी कॅम्पसमध्ये प्रक्षेपण यानाची निर्मिती, एकत्रीकरण आणि चाचणी करता येईल. दर महिन्याला एक ऑर्बिटल रॉकेट तयार करण्याची याची क्षमता असेल. स्कायरूट ही भारतातील आघाडीची खाजगी अंतराळ कंपनी आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे माजी विद्यार्थी आणि इस्रोचे शास्त्रज्ञ पवन चंदना आणि भरत ढाका यांनी या कंपनीची स्थापना केली आहे. अवकाशात रॉकेट प्रक्षेपित करणारी ही पहिली भारतीय खाजगी कंपनी आहे. नोव्हेंबर 2022 मध्ये स्कायरूटनं विक्रम एस हे सब ऑर्बिटल रॉकेट प्रक्षेपित केलं होतं.

**<u>यूनेस्को</u>**

महाराष्ट्र शासनाने युनेस्कोच्या मुख्यालयाला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेट म्हणून दिला होता. युनेस्कोच्या पॅरिसमधील मुख्यालय प्रांगणात कालच्या संविधान दिनी या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही अनेक लोकांना प्रेरणा देतात, संविधान दिनी त्यांच्या पुतळ्याचं युनेस्कोच्या मुख्यालयात अनावरण होणं ही राज्यघटनेच्या निर्मितीमधील त्यांच्या योगदानाला दिलेली खरी श्रद्धांजली आहे, असं पंतप्रधानांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. तर, हा क्षण तमाम भारतीयांसाठी अभिमानाचा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनेस्कोशी संबंधित सर्व पदाधिकारी, वरिष्ठाधिकारी यांचे आभार मानले आहेत.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय पुणे मेट्रो</u>**

पुण्यातल्या खडकवासला ते खराडी आणि नळ स्टॉप ते माणिकबागेदरम्यानच्या नव्या मेट्रो मार्गांना तसंच बदलापूर आणि कर्जत दरम्यानच्या अतिरिक्त रेल्वेमार्गाला केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रि अश्विनी वैष्णव यांनी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुण्यातल्या 4 आणि 4 ए या नव्या मार्गिकांसाठी 9 हजार 858 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. येत्या 5 वर्षात हे मार्ग पूर्ण करण्याचं उद्दिष्ट असून त्यानंतर पुण्यातल्या मेट्रो मार्गांची लांबी 100 किलोमीटर पेक्षा जास्त होईल. या निर्णयाबद्दल केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. याबाबत पुण्यात माध्यमांशी बोलताना मोहोळ म्हणाले....

**गेले काही दिवस ज्या दोन मेट्रो मार्गाची प्रतीक्षा पुणेकरांना होती त्या खराडी ते खडकवासला नळस्टॉप ते वारजे माणिकबाग या जवळपास एकतीस पॉइंट सहा किलोमीटरच्या मेट्रो मार्गाला आज केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली. माननीय मोदीजींचे माननीय देवेंद्रजींचे मी पुणेकरांच्या वतीनं या ठिकाणी मनापासून धन्यवाद व्यक्त करतो. पुण्याची मेट्रोची जी काही व्यवस्था आहे खर तर मोदीजी पुण्यातल्या मेट्रोचं भूमिपूजन केलं, आणि आता टप्प्याटप्प्याने या मेट्रो मार्गाचं उद्घाटन होतंय जवळपास बत्तीस किलोमीटरची मेट्रो मार्ग आता सुरू आहे. त्यात पुन्हा स्वारगेट ते कात्रज या भुयारी मेट्रो मार्गाचं काम सुरु होत आहे हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गाचं काही दिवसात उद्घाटन होत आहे. आता त्यात अधिकच्या या एकतीस पॉइंट सहा किलोमीटरचं नव्यानं नेटवर्क तयार होईल. जवळपास नऊ हजार आठ सत्तावन्न कोटी रुपयांचा हे दोन्ही प्रकल्प ज्याला आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली हे पाच वर्षामध्ये पुढच्या हे प्रकल्प पूर्ण करण्याचं उद्दिष्ट राहील आणि म्हणून पुण्याची एकूणच वाहतुकीचा प्रश्न पाहता मागच्या काळात केंद्रीय मंत्रिमंडळानं केंद्र सरकारनं पुण्याला एक हजार ई बसेस सुद्धा मंजूर केल्या आज बत्तीस किलोमीटरचा नवीन मेट्रो मार्ग सुद्धा मंजूर केला हे पुणेकरांसाठी अत्यंत समाधानाची आणि आनंदाची ही बातमी आहे.**

बदलापूर - कर्जत दरम्यान 65 किलोमीटरच्या तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. सव्वा तेराशे कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असलेल्या या प्रकल्पाचा निम्मा खर्च राज्य सरकार उचलणार आहे. दुर्मिळ खनिजांपासून चुंबक उत्पादनाच्या योजनेलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मान्यता दिली.

**<u>कर्जवसूली स्थगिती</u>**

महाराष्ट्रात यंदा जून ते सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पुढच्या एक वर्षासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच सर्व बाधित तालुक्यांच्या सर्व गावातील बाधीत शेतकऱ्यांच्या अल्पमुदत कर्जाचं मध्यम मुदत कर्जात रुपांतरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सहकार विभागाने यासंदर्भातील परिपत्रक जारी केलं आहे. राज्य सरकारने ऑक्टोबर महिन्यात 32 हजार कोटींचा विशेष मदतनिधी जाहीर केला होता; त्याचवेळी दुष्काळी उपाययोजना, सवलती लागू करण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर कर्ज पुनर्गठन आणि वर्षभरासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली आहे.

**<u>मुर्मू ओडिशा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून ओडिशा आणि उत्तर प्रदेशच्या 2 दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. आज त्या भुवनेश्वर इथं ओडिशा विधानसभेच्या सदस्यांना संबोधित करणार आहेत. उद्या लखनौ इथं होणाऱ्या ब्रह्माकुमारींच्या 2025-26 च्या वार्षिक कार्यक्रमात त्या सहभागी होतील. यावर्षीच्या या कार्यक्रमाची संकल्पना राष्ट्राच्या एकतेसाठी ध्यानधारणा आणि विश्वास ही असणार आहे. उद्या राष्ट्रपति भारत स्काउट गाईडसच्या हिरक महोत्सवी समारंभाच्या समारोपालाही उपसाठीत राहणार आहेत. 19 व्या राष्ट्रीय जंबोरीलाही त्या संबोधित करतील.

**<u>ट्रंप जी 20</u>**

मियामी इथं पुढील वर्षी होणाऱ्या जी 20 शिखर परिषदेत दक्षिण आफ्रिकेला आमंत्रित केलं जाणार नाही असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जाहीर केलं आहे. यावर्षीच्या जी 20 परिषदेत अमेरिकेच्या एक प्रतिनिधि बरोबर गैरवर्तन केल्यामुळं अमेरिकेकडून त्या देशाला देण्यात येणारी अनुदानं आणि देयकं थांबवण्यात आली आहेत असं ट्रंप यांनी आपल्या समाज मध्यमांवरी एका संदेशात म्हटलं आहे. दक्षिण आफ्रिकेनं अमेरिकी दुतावासाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे जी 20 यजमान पदाची जबाबदारी सोपवण्यास नकार दिल्यामुळं अमेरिकेनं हे पाऊल उचलल असल्याचं ट्रंप यांनी म्हटलं आहे.

**<u>मोरोक्को भारत चर्चा</u>**

सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी काल रॉयल मोरोक्कन नौदलाचे महानिरीक्षक रिअर ॲडमिरल मोहम्मद ताहीन यांच्यासमवेत द्विपक्षीय बैठक घेतली. यामध्ये दोन्ही देशांमधील संरक्षण निर्यातीला आणखी चालना देणं, संरक्षण उद्योगांमधील सहकार्य वाढवणे तसंच दोन्ही दशांदारम्यान सागरी सुरक्षा अधिक दृढ करण्याच्या मार्गांवर चर्चा करण्यात आली.

भारतानं लष्करी प्रशिक्षण, आपत्ती निवारण सराव, आणि व्यावसायिक लष्करी शिक्षण यामध्ये मोरोक्कन सष्टर दलांना पाठिंबा देणार असल्याचा पुनरुच्चार केला. बैठकीत द्विपक्षीय संरक्षण सहकार्य मजबूत करण्यावर, तसंच दोन्ही दलांमधील व्यावसायिक देवाणघेवाण वाढवण्यावर चर्चा झाली असल्याचं भारतीय लष्करानं आपल्या समाज मध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>आधार</u>**

UIDAI म्हणजेच भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणानं सुमारे दोन कोटीहून जास्त आधार क्रमांक निष्क्रीय केले आहेत. हे सर्व क्रमांक धारक मरण पावले असल्यानं, आधार डेटाबेसच्या देशव्यापी मोहिमेअंतर्गत त्यांचे क्रमांक निष्क्रीय केल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं दिली. यातला कोणताही क्रमांक नव्याने इतर कोणालाही नव्याने दिलेला नाही असंही स्पष्ट केलं आहे.

**<u>खरीप उत्पादन</u>**

यंदाच्या आर्थिक वर्षात देशात खरीप पिकांचं उत्पादन 1 हजार 74 लाख टन होण्याचा अंदाज आहे. कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल खरीप पिकांचा आगाऊ अंदाज जाहीर केला. त्यानुसार अन्नधान्याच्या उत्पादनात 38 लाख 70 हजार टनांनी वाढ होईल असा अंदाज आहे. देशात यंदा अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पिकांचं नुकसान झालं असलं तरी अनेक भागात चांगला पाऊस झाल्यानं पिकांना फायदा झाला असल्याचं चौहान यांनी सांगितलं.

**<u>राष्ट्रकुल</u>**

शंभरावी राष्ट्रकुल स्पर्धा 2030 मध्ये गुजरातच्या अहमदाबाद इथं होणार आहेत. राष्ट्रकुल संघटनेनं काल ग्लासगो इथं औपचारिकरीत्या राष्ट्रकुल स्पर्धांच्या आयोजनाचे अधिकार भारताकडे सोपवले. यात 74 देशातले खेळाडू सहभागी होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या आयोजनाची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. जगभरातल्या खेळाडूंचं स्वागत करण्यासाठी इच्छुक असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली. राष्ट्रकुल स्पर्धांचं यजमानपद भूषवण्याची भारताची ही दुसरी वेळ आहे.

**<u>हवामान</u>**

पंजाबमध्ये आज थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. तर हरियाणा, चंदीगढ, दिल्ली आणि हिमाचल प्रदेशतील काही ठिकाणी धुकं राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अंदमान आणि निकोबार बेटांवर ढगांच्या गडगडाट, सोसत्याच्या वाऱ्यासह मुसळधार टे अतिमुसळधार पावसाची शक्यत हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.